# श्रद्धा, अहंगंड आणि सहजीवन

गणेशोत्सवाच्या निमित्ताने दीड-दोन वर्षांपूर्वी घडलेला एक प्रसंग मला आठवला. मानसी माझ्याकडे समुपदेशनासाठी आली होती. तिचं लग्न होऊन जेमतेम वर्षभराचा काळ उलटला होता. केबिन मध्ये येऊन स्थिरस्थावर होताच धबधबा कोसळावा तशी ती एकदम भडाभडा बोलू लागली, "मला समीरचं काही कळतच नाही. इतका शिकला सवरलेला मुलगा आहे तो. आजच्या पिढीचा. पण असं असूनही आजोबांच्या पिढीतला असल्यासारखा कर्मठ वागतो कधीकधी. आणि यावर मी काही बोलले की आपली संस्कृती अशीच आहे असं थंडपणे म्हणतो. मकडोनाल्डचा बर्गर खाताना त्याला आठवत नाही की ती पाश्चात्य संस्कृती आहे वगैरे. आणि मुळात इथे प्रश्न संस्कृतीचा नाहीचे... प्रश्न आहे समजून घेण्याचा...."
"अगं हो हो... किती बोलते आहेस एकदम... काय झालं? नेमकं काय घडलं ते संग पाहू मला नीट", मी तिचा बोलण्याचा प्रवाह थांबवून संभाषण नेमक्या विषयाकडे आणायचा प्रयत्न केला.
तिचा मूळ प्रश्न असा होता की समीरचं घर अगदी धार्मिक होतं. धार्मिक म्हणजे सगळी व्रतवैकल्य पाळणारं. श्रावणात घरात पूजा होणार म्हणजे होणार, पाठोपाठ गणपती येणार. मग गौरी बसणार. त्यांची खास तयारी. शिवाय गणेशोत्सव दीड वा पाच वगैरे दिवसांचा नाही तर पूर्ण दहा दिवसांचा. त्यानंतर आला पितृपंधरवडा. आपल्या पितरांची आठवण म्हणून एखादी पूजा व्हायची. तो संपतोय तोवर नवरात्राची देवी घरात बसायची. ती नवसाची मागवून आणलेली वगैरे होती म्हणे. त्यामुळे त्या देवीची विशेष बडदास्त ठेवावी लागत असे. एवढे होऊन मोकळा श्वास घेईपर्यंत दिवाळीच्या सुट्ट्या लागायच्या आणि मग नातेवाइकांची वर्दळ सुरु व्हायची. मग त्यांची सरबराई करा. शिवाय आपल्याकडे प्रत्येक सणाचे वेगवेगळे खाद्यपदार्थ! ते समीरच्या घरात अगदी हौसेने बनवले जायचे. मानसी या सगळ्याने प्रचंड वैतागली होती. तिला अशी सवयच नव्हती काही. त्यातही तिच्या नवऱ्याची म्हणजे समीरची अशी अपेक्षा असे की 'माझी आई गेली कित्येक वर्ष हे सगळं एकहाती करते आहे.' तुला लगेच पहिल्याच वर्षी कुरकुर करायला काय झालं एवढं?! झालं... यावरून दोघांची जुंपली होती. आणि म्हणूनच तिने समुपदेशाकाकडे जायचा निर्णय घेतला होता.

असाच एक अगदी उलट प्रसंगही माझ्या पाहण्यात होता. अगदी उत्सवी, धार्मिक घरातली प्रियांका लग्न होऊन नवऱ्याच्या, अलोकच्या घरी गेली तेव्हा तिथे जाम वैतागली, कारण तिथे देव वगैरे मानायची प्रथाच नव्हती. 'घरात देव्हारा सुद्धा नाही.' या कल्पनेनेच ती अस्वस्थ झाली. 'आम्ही नास्तिक आहोत' हे अलोकने लग्नापूर्वी तिला सांगितलं होतं. पण नास्तिकता अशी असते याची तिला सुतराम कल्पना नव्हती बहुतेक. साहजिकच गणपती बसवूया, दसऱ्याला सरस्वती पूजन करूया असलं काहीही म्हणलं की अलोकचं संपूर्ण कुटुंब निरुत्साही असे. इतकच नव्हे तर एखाद-दोन वेळा अलोकने 'काय या अंधश्रद्धा' असं म्हणत तिची यथेच्छ टिंगलदेखील केली. साहजिकच प्रियांकाचा या गोष्टीवरचा राग इतर ठिकाणी निघू लागला. आणि तिच्यात आणि अलोकमध्ये जोरदार भांडणं होऊ लागली.

माणूस जसा वाढतो, ज्या वातावरणात वाढतो, ज्या संगतीत राहतो त्या सगळ्याचा परिणाम होत त्याच्या आशा, आकांक्षा आणि श्रद्धा तयार होत जात असतात. धार्मिक कार्यांच्या बाबतीत अनेकदा अनेक

वर्षांच्या परंपरा ठरून गेलेल्या असतात. माणूस या सगळ्या बाबतीत अनेकदा हळवा असतो. लग्न झाल्यावर आपल्या जोडीदाराने आपल्या या हळव्या भावनांचा आदर राखावा अशी अपेक्षा असण्यात चूक नाही. दोघांच्या श्रद्धास्थानांमध्ये आणि श्रद्धेच्या तीव्रतेत (intensity) फारसा फरक नसेल तर हा प्रश्नच येत नाही. पण फरक असेल तर मात्र अनेकदा गफलत अशी होते की 'आपल्या श्रद्धा आणि भावना या आपल्या जोडीदाराने तंतोतंत स्वीकारल्या पाहिजेत, आणि इतक्या मनापासून स्वीकारल्या पाहिजेत की त्या त्याला/तिला स्वतःच्याच वाटाव्यात' अशी अवास्तव अपेक्षा ठेवली जाते. पण मग नेमके काय करावे? वेगवेगळ्या श्रद्धा असणारी दोन माणसे एकत्र कधीच राहू शकत नाहीत का? याचं एका वाक्यात उत्तर म्हणजे आपापल्या श्रद्धा कितीही वेगळ्या असल्या तरी नवरा-बायकोच्या नात्यात असणाऱ्या दोन व्यक्ती अगदी आनंदात एकत्र राहू शकतात. फक्त गरज असते ती आदर भावनेची. आणि हो, समोरच्याने आदर भावना बाळगणे म्हणजे 'मी म्हणेन ते त्याने/तिने ऐकणे' असा नसून समोरच्या व्यक्तीला त्याच्या श्रद्धांसह स्वीकारणे, हा आहे. त्या श्रद्धा या त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा, आयुष्याचा भाग आहेत ही गोष्ट ही गोष्ट स्वीकारणे. वाटते तितकी ही गोष्ट सोपी नाही. लग्न करताना अनेकांना 'त्यात काय एवढं' असं वाटू शकतं. पण आपल्या जोडीदारासोबत असणारी आपली अनुरूपता बघत असताना जोडीदाराच्या श्रद्धास्थानांबरोबर आपली अनुरूपता असणार आहे काय याचाही विचार व्हायला हवा. ती अनुरूपता नसेल तर या परिस्थितीत स्वतःत काय बदल करावे लागतील, जोडीदाराच्या कोणत्या गोष्टी आहेत तशा स्वीकाराव्या लागतील या सगळ्याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

श्रद्धास्थानं आणि श्रद्धेची तीव्रता या गोष्टी लग्न ठरवताना वा लग्नानंतरही सहजीवनातील अडसर ठरू नयेत म्हणून तीन मुख्य गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. पहिला लक्षात ठेवायचा मुद्दा म्हणजे 'आपल्या जोडीदाराच्या श्रद्धा अगदी सेम टू सेम आपल्यासारख्याच करण्याचा विडा आपण उचललेला नाही, ते करण्याची आवश्यकताही नाही' हे लक्षात ठेवायला हवं. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे 'माझ्या श्रद्धा या सर्वश्रेष्ठ आहेत आणि हेच अंतिम सत्य आहे. बाकी सगळ्या श्रद्धा माझ्या श्रद्धेसमोर तुच्छ आहेत' हा धोकादायक विचार मनाच्या आसपास फिरकूही न देण्याची खबरदारी घ्यायला हवी. आणि तिसरं म्हणजे 'एक नवरा/बायको म्हणून आपल्या जोडीदाराच्या सुखासाठी त्याच्या/तिच्या श्रद्धेच्या गोष्टीत सहभागी होऊन झाल्याने आपण वा आपली श्रद्धा कमी प्रतीची ठरत नाही', यावर विश्वास ठेवणं. श्रद्धा या अहंगंडावर वा दुसऱ्या श्रद्धांच्या तुच्छतेवर अवलंबून असणं हे संपूर्ण समाजाच्या पातळीवर जितकं विघातक आहे तितकंच सहजीवनात देखील हानीकारक आहे.

जाता जाता एक महत्वाचा मुद्दा नमूद करते- श्रद्धा म्हणल्यावर बहुतेकवेळा आपल्या डोळ्यासमोर देव-धर्म इत्यादी गोष्टी येतात. पण आपल्या आयुष्यात एवढीच श्रद्धास्थानं असतात असं नव्हे. अनेक व्यक्तीही श्रद्धेची स्थानं पटकावून असतात. कधी त्या व्यक्ती म्हणजे आपल्या गुरु असतात, कधी एखादा मार्गदर्शक, कधी एखादा नेता, कधी एखादा नातेवाईक...इतकच काय कधी एखादा क्रिकेटपटू देखील आपलं श्रद्धास्थान असू शकतो. 'सचिन मैदानात आहे तोपर्यंत आपण सामना जिंकू' अशी श्रद्धा लाखो भारतीय चाहते ठेवायचेच की! व्यक्तीप्रमाणेच वेगवेगळ्या विचारसरणी देखील श्रद्धेची स्थानं असतात. कोणाची श्रद्धा कम्युनिझमवर असेल, कोणाची भांडवलवादावर. कोणाची जागतिकीकरणावर तर कोणाची स्वदेशीवर. हे सगळं इतकं सविस्तर मांडायचा उद्देश असा की, आपल्या जोडीदारासकट आपलं

सगळ्यांचंच जग अनेक प्रकारच्या श्रद्धांनी बनलं आहे, समृद्ध झालं आहे. हे सत्य स्वीकारणं आणि एकमेकांच्या श्रद्धांचा योग्य तो आदर राखणं ही समृद्ध सहजीवनाकडे जाणाऱ्या मार्गातील अत्यंत महत्वाची आणि टाळता न येणारी पायरी आहे. ही पायरी यशस्वीपणे पार पाडण्याची सद्‌बुद्धी आपल्या सर्वांना मिळो हीच बुद्धीची देवता असलेल्या गणरायाच्या चरणी नम्र प्रार्थना!